वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. १५ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# कोणीतरी ठरवून धसांचा गेम तर केला नाही ना?




Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

## बावनकुळेंची मध्यस्थी; धस-मुंडे यांच्यात ४-५ तास गुफ्तगू



## 'या' भेटीमुळे नेटकऱ्यांमध्ये उलटसुलट चर्चा!




बीड, (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अमानुष हत्या, बीड जिल्ह्यातील अराजक, माफियाराज, भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणणारे भाजप आमदार सुरेश धस आणि संशयाच्या भोवऱ्यात असलेले मंत्री धनंजय मुंडे यांची महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भेट घडवून आणली. या गुप्तभेटीमुळे खळबळ उडाली असली तरी आमदार धस यांनी आपल्यात कोणताही समेट झाला नसल्याचा खुलासा केला आहे. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी या भेटीवर संतप्त प्रतिक्रिया दिली असून, आमदार सुरेश धस यांच्याकडून हे अपेक्षित नव्हते, असे ते म्हणाले.

गेल्या दोन महिन्यांपासून भाजप आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर वेगवेगळे आरोप करून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. संतोष

▶▶ पान २ वर

## आम्हाला रोज धमकावले जातेय!

### बीडमध्ये 'आका 'ची 'बी टीम' सक्रिय धनंजय देशमुख यांचा खळबळजनक आरोप



वाल्मीक कराड जेलात असला म्हणून काय झाले... त्याची 'बी टीम' आता सक्रिय झाली आहे. आरोपींना सोडायला गेलेले, त्यांना सहकार्य करणारे, गाड्या, पैसा पुरवणारे ही चांडाळ चौकडी धनंजय मुंडे यांच्या निकटवर्तुळातील असल्याचा खळबळजनक आरोप मयत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय

▶▶ पान २ वर

### बीडमधील अराजकाच्या 'आका'ला राष्ट्रवादी काँग्रेसचा कुर्निसात

बीडमधील अराजकाचे 'आका' धनंजय मुंडे यांच्यावर लाख आरोप होऊनही अजित पवारांच्या लेखी ते 'नैतिक' दृष्ट्या धुतल्या तांदळासारखे स्वच्छ आहेत ! राष्ट्रवादी काँग्रेसने धनंजय मुंडे यांच्या गुंडगिरीला कुर्निसात करत त्यांना पक्षाच्या कोअर कमिटीत मानाचे पान दिले आहे.बीड जिल्ह्यातील अराजकाचे धनी तसेच राखमाफिया, जागामाफिया, वाळूमाफिया, खंडणीमाफियांचे आश्रयदाते अशी बिरूदावली मिरवणारे धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विरोधकांनी जंगजंग

▶▶ पान २ वर

### कोअर ग्रुपमध्ये स्थान म्हणजे पक्षाचे पाठबळ?

१.धनंजय मुंडे यांना कोअर ग्रुपमध्ये स्थान देऊन पक्ष त्यांच्या भक्कमपणे पाठिशी असल्याचा संदेश दिला आहेच. शिवाय अजित पवारांनी त्यांना एक प्रकारे पाठबळ दिल्याचे बोलले जात आहे.

२.या ग्रुपमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ व मुंडे यांचा समावेश आहे.

३.पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या ग्रुपचा मुख्य उद्देश पक्षाची पुनर्बांधणी आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी नियोजन करणे आहे.

### वक्तव्यांत विरोधाभास, नेमके खरे कोणाचे?

१.मुंडे आणि धस यांच्या भेटीसाठी आपण मध्यस्थी केल्याचे बावनकुळे यांनी स्वतःच सांगितले. ही भेट आपल्या घरी झाल्याचे ते म्हणाले. चार-साडेचार तास आम्ही तिघे एकत्र होतो, असे ते माध्यमांशी बोलताना म्हणाले. ही भेट नेमकी कधी झाली असे विचारले असता, बावनकुळे यांनी तारीख, दिवसाचे काय करता? असा प्रतिप्रश्न केला.

२. आ. सुरेश धस यांनी मात्र मुंडे यांच्या डोळ्याचे ऑपरेशन झाल्याने विचारपूस करण्यासाठी आपण मुंडे यांना भेटण्यासाठी त्यांच्या बंगल्यावर गेलो होतो, असे सांगितले.

३. दोघांच्या दोन दाव्यांमुळे ही भेट नेमकी कधी आणि कुठे झाली, याबाबत वेगवेगळी माहिती दिली गेली.

४.चंद्रशेखर बावनकुळे हे मंत्रालयासमोरील बी ५ या बंगल्यात राहतात, तर धनंजय मुंडे यांचा सातपुडा हा बंगला मलबार हिल येथे आहे. दोन बंगल्यांमध्ये सात किलोमीटरचे अंतर आहे.

५.बावनकुळे यांनी भेटीची तारीख सांगितली नाही. मात्र, गेली आठ-दहा दिवस डोळ्याच्या ऑपरेशनमुळे धनंजय मुंडे हे आधी हॉस्पिटलमध्ये होते आणि नंतर बंगल्यावर आराम करीत आहेत. ते मंत्रिमंडळ बैठकीलाही गेलेले नव्हते. बावनकुळेंच्या बंगल्यावर ही भेट झाली असेल तर ती किमान दहा दिवस आधी झालेली असण्याची शक्यता आहे.

### "मनभेद नाही; मतभेद आहेत

आम्ही काही वेळ एकत्र होतो. दोघांमध्ये मनभेद नाही; थोडे मतभेद आहेत, ते दूर होतील. मी पक्षाचा अध्यक्ष आहे, माझ्याकडे दोघेही भेटले. मुंडे यांनी भाजपच्या प्रवासासोबत माझ्यासोबत काम केले आहे. आम्ही तिघेही परिवार म्हणून बसलो होतो, मी कोणालाही तडजोड करायला सांगितले नाही, असे बानकुळे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

### "हे धक्कादायक

संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख म्हणाले की, ही भेट नक्की कोणत्या कारणासाठी झाली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. न्याय मिळवण्यासाठी आम्ही लढत असताना काही लोक वेगळी भूमिका घेत असतील, तर ते दुर्दैवी आहे. धस यांनी अचानक मुंडे यांची भेट घेणे आमच्यासाठी धक्कादायक आहे

### "अंजली दमानिया म्हणाल्या, राजकीय सेटिंग बघून किळस वाटते

या घडामोडींवर बोलताना सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया म्हणाल्या की, मला अतिशय दुःख होत आहे. ही अशी राजकीय सेटिंग बघून किळस वाटते. उद्धव सेनेच्या नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या की, सुरेश धस यांनी बीडच्या जनतेचा विश्वासघात केला आहे.

### "प्रकृतीची चौकशी करायला गेलो, त्यात गैर काय ? पण धनंजय मुंडेंशी मतभेद आहेतच


आमदार सुरेश धस : धनंजय मुंडे यांचे ऑपरेशन झालेले आहे. त्या दिवशी रात्री त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. दुसऱ्या दिवशी लपूनछपून नव्हे तर दिवसा त्यांच्या घरी गेलो होते. प्रकृतीची चौकशी करणे यात गैर काय? संतोष देशमुख हत्या प्रकरणातील लढा आणि प्रकृतीची चौकशी याचा काहीही संबंध नाही. हा संबंध कृपया जोडू नये. आमच्यात कुणीही मध्यस्थी केलेली नाही, आमचा लढा सुरूच राहणार आहे.प्रदेशाध्यक्ष माझ्यापेक्षा फार मोठे आहेत,

▶▶ पान २ वर

## बीडमधील रेल्वेच्या ठेकेदारांनी मजुरांचे पैसे बुडविले

### तक्रार कोणाकडे करायची ?मजुरांचे भाडेभासनेही हिसकावून घेतले

बीड, (दिव्य न्युज):- शिरूर पासून बीडपर्यंत रेल्वेचे विविध कामे हिमाचलम ठेकेदार या कंपनीला देण्यात आलेले आहे. रायमोहा येथे या ठेकेदारांकडून पुलाचे काम सुरू असून या कामांवर या ठेकेदारांनी मजुरांकडून कामे करून घेतले पण त्यांचे पैसे दिले नाही. उलट पैसे बुडवून त्या मजुरांचे घरउपयोगी साहित्यही हिसकावून घेत डांबून ठेवले



यामुळे या मजुरांवर उपासमारीची वेळ आली असून या मजुरांचे पैसे बुडविणाऱ्या ठेकेदार रेड्डी, ठेकेदार तौसीफ आणि अमित सहानी या तिघांवर रेल्वे विभागानी कायदेशीर कारवाई करत या मजुरांचे पैसे मिळवून द्यावे नसता या विरूध्द मोठे आंदोलन करण्यात येईल असा इशारा समाजसेवक जमीर शेख यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे.

या विषयी अधिक माहिती अशी की, रायमोहा येथे रेल्वेसाठी पुलाचे काम

▶▶ पान २ वर





## बार्शी नाका-इमामपुर रोडवरील रेल्वे स्टेशनच्या मागणीला ग्रीन सिग्नल

### केंद्रीय रेल्वे मंत्र्यांनी दिले सर्व्हेक्षणाचे निर्देश

बीड (दिव्य न्युज):- बीड शहरातील बार्शी नाका इमामपुर रोडवरील नव्या रेल्वे स्टेशनसंदर्भात सर्वेक्षण करण्याचे आदेश केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिले आहेत. खा.बजरंगबप्पा सोनवणे यांनी दिल्लीत केलेला पाठपुरावा आणि बीडच्या बार्शी नाका रेल्वे स्टेशन संघर्ष समितीच्या लढ्याला या माध्यमातून मोठे यश आले आहे. केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने हा विषय मनावर घेतला हेच खुप मोठे यश असुन सर्वेक्षणानंतर निश्चितच बार्शी नाका इमामपुर रोडवर नव्या रेल्वे स्टेशनला मंजुरी मिळेल.

बीड जिल्ह्याचे खा.बजरंगबप्पा सोनवणे यांनी बार्शी नाका इमामपुर रोडवरील रेल्वे स्टेशन संदर्भात केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना दि.३ फेब्रुवारी २०२५ रोजी पत्र दिले होते. या ठिकाणी रेल्वे थांबा किती आवश्यक आहे हे देखील केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना अधोरेखित केले होते. अखेर केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने बजरंगबप्पांच्या मागणीची आणि बीड येथील समाजसेवक इम्रान जहॉगिरदार व मुसा खान यांच्यासह इतरांनी यासाठी लढा दिला होता. याच लढ्याची दखल घेत बार्शी नाका येथे नवीन रेल्वे स्टेशन निर्मितीच्या अनुषंगाने सर्वेक्षण करण्याचे निर्देश रेल्वे विभागाला दिले आहेत. दरम्यान बीड

▶▶ पान २ वर



अश्विनी वैष्णव
Ashwini Vaishnaw

रेल, सूचना और प्रसारण एवं इलेक्ट्रॉनिकी और सूचना प्रौद्योगिकी मंत्री
भारत सरकार
Minister of Railways, Information & Broadcasting and Electronics & Information Technology
Government of India

MR/A/...153.156/2025

12 FEB 2025

माननीय श्री बजरंग मनोहर सोनवणे जी,

आपके दिनांक 03.02.2025 के पत्रों के लिए धन्यवाद।

आपके पत्र में उल्लेखित बार्शी नाका, बीड में नए रेलवे स्टेशन का निर्माण किये जाने एवं अन्य मामलों की विस्तृत जांच करने के लिए संबंधित निदेशालय को निर्देश दे दिया गया है।

सादर,

अश्विनी वैष्णव

श्री बजरंग मनोहर सोनवणे
माननीय संसद सदस्य
एसओ सोनवणे, मंचर, सरनी (ए)
डाकघर- जवलबन
तालुका, कैज, बीड, महाराष्ट्र 431518





● अपघाताचे प्रमाण अधिक ● अपघातामुळे अनेकांना अपंगत्व आले ● वाहनधारकांना तज्ज्ञांचा सल्ला ठरणार मोलाचा

# वेगमर्यादा सांभाळा जीवन वाचवा!

## प्राणांतिक अपघाताचे प्रमाण चिंताजनक

बीड जिल्ह्यात वर्षभरात रस्ते अपघातात ४५८ नागरिकांचा मृत्यू

जिल्ह्यात २०२४ या एका वर्षातील रस्ते अपघातांमध्ये ४५८ जणांचा अपघाती मृत्यू ओढवला आहे. जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या तुलनेत राज्य महामार्गावर प्राणांतिक अपघाताचे प्रमाण अधिक आहे. याशिवाय व जिल्हा मार्गावरील अपघात व मृत्यू झालेल्या नागरिकांची संख्याही धक्कादायक आहे.अपघातांमुळे मृत्यू ओढवलेल्या कुटूंबाची कधीही भरुन न येणारी हानी होते तर अपघातांमुळे येणाऱ्या अपंगत्वामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.तसेच अपघातामुळे अनेकांना अंपगत्व आले आहे, तर अनेकजण जखमी झाले आहेत.

### वेगाचा मोह आवरला नाही तर...

● बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या एक वर्षात राष्ट्रीय महार्गावर ८५, राज्य महामार्गावर २०३ व इतर रस्त्यांवर १३८ अशा एकूण ४२६ अपघातात ४१४ पुरुष व ४४ महिला असे एकूण ४५८ जणांचा मृत्यू झाला. जिल्ह्यात याच कालावधीत ३४२ अपघात गंभीर अपघात झाले. यात ४८३ पुरुष व ९६ महिला गंभीररित्या जखमी झाल्या. याशिवाय ४५ किरकोळ अपघातात ८१ पुरुष व २१ महिला असे एकूण १०२ जण जखमी झाले आहेत.जिल्ह्यात गेल्या काही वर्षात जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी चांगले, दर्जेदार रस्ते तयार झाले. त्यांवर वाहनचालकांना वेगाचा मोह आवरला नाही तर मृत्यूच्या वाटेवर घेवून जात असल्याचे गत वर्षातील अपघातांच्या आकडेवारीवरुन दिसून येते.



### ...म्हणून अपघातांची संख्या जास्त

● बीड जिल्ह्याच्या पूर्वेला परभणी, पश्चिमेला अहमदनगर, उत्तरेला जालना आणि औरंगाबाद, आणि दक्षिणेला लातूर आणि धाराशिव जिल्हा आहे. सोलापूर-छत्रपती संभाजीनगर-धुळे हा राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ हा बीड जिल्ह्यातून जातो. हा महामार्ग औरंगाबाद, धुळे, उस्मानाबाद आणि सोलापूर ह्या शहरांना जोडतो तर कल्याण- विशाखापट्टणम हा राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ बीड जिल्ह्यातून जातो.

● या महामार्गावरुन हा जिल्हा गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि मध्यप्रदेशमधील शहरांशी जोडला गेला आहे. बीडपासून मुंबई ४५० कि.मी. अंतरावर असले तरी बीड जिल्ह्यातून पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, सोलापूर, कोल्हापूर या शहरांकडे होणारी वाहतूक मोठ्या प्रमाणात असते. जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर आणि राज्य महामार्गावर होणाऱ्या अपघातांची संख्या जशी जास्त आहे तशीच ती इतर मार्गावरही वाढत चालल्याचे जिल्हा विशेष शाखेकडील आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

### अपघातांची मालिका थांबेना

१ रस्त्याच्या कडेला व्यायाम करणाऱ्या तीन युवकांना भरधाव एसटी बसने चिरडल्याची घटना बीड-परळी महामार्गावरील मोचीपिंपळगाव फाटा येथे १९ जानेवारी २०२५ रोजी पहाटे घडली होती.

२ त्यानंतर केज तालुक्यातील सारणी सांगवी फाटा येथे ७ फेब्रुवारी रोजी टेम्पो-जीपच्या धडकेत वधूपित्यासह नातेवाईक महिलेचा मृत्यू ओढवला.

३ ही घटना घडते न घडते तोच मांजरसुंबा (ता.बीड) येथून जवळच असलेल्या मुळूकवाडी शिवारात भरधाव कार पुलाच्या कठड्याला धडकून डॉक्टर बहिण-भावाचा मृत्यू झाला. ह्रदय पिळवटून टाकणाऱ्या या अपघाताच्या घटना मन विषन्न करणाऱ्या आहेत.

### गतवर्षीही ४०७ अपघात

● जिल्ह्यात २०२३ मध्ये वेगवेगळ्या ठिकाणी अपघाताच्या एकूण ४०७ घटना घडल्या होत्या. यात तब्बल ४५० जणांचा मृत्यू झाला होता यात ४०१ पुरुष व ४९ महिलांचा समावेश होता.




### रस्ते सुरक्षा अभियान

वाहन चालवताना जास्त काळजी घ्या, दोन्ही बाजूंनी चालणाऱ्या वाहनांकडे काळजीपूर्वक लक्ष द्या, कायम सावध राहा...

आयुष्य अनमोल आहे; सुरक्षित राहा

### तज्ज्ञांचा सल्ला

- निष्काळजीपणा टाळा
- शक्यतो रात्रीचा वाहन प्रवास टाळा
- 'रोड हिप्नोटाईज'अवस्थेत न जाण्यासाठी वेगमर्यादा सांभाळावी
- सलग काही तास वाहन चालवल्यानंतर टप्प्याटप्प्याने विश्रांती घ्यावी
- वाहतूक नियमांचे अन् सूचनांचे पालन हवे, अधिक वेगाचा हव्यास नकोच
- वाहनाच्या चाकांमधील हवा, इंधनाची खात्री असावी
- महामार्गावर स्वत:ची लेन सोडून जाऊ नये

## मांजरसुंबा गावचा सुपुत्र आकाश चौधरी याची महसूल सहाय्यक पदी निवड

बीड (दिव्य न्युज):- बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील स्व.दिलीप चौधरी यांचे चिरंजीव आकाश चौधरी यांची एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन महसूल सहायक पदी निवड झाली मांजरसुंबा गावातून पहिला अधिकारी होण्याचा मान आकाशने मिळवला असल्याने गावातील सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव व कौतुक होत आहे. आकाश चौधरी यांची एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन महसूल सहायक पदी निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांनी स्वागत केले. स्पर्धा परीक्षा आणि त्यासाठीची तयारी ही सामान्यत: कठीण आणि आव्हानात्मक असते. मात्र, अनेक अडचणींवर मात करून आकाश चौधरी याने यश संपादन केले व आपल्या वडिलांचं स्वप्न पूर्ण करत वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. या यशाबद्दल मांजरसुंबा गावासह संपूर्ण बीड जिल्ह्यातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तुकाराम महाराज म्हणतात तस शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्तीप्रमाणे जिद्द, संघर्षाची तयारी आणि त्याला अभ्यासाची जोड असेल तर कुठल्याही परिस्थितीवर मात करता येते अनेक वर्षापासून शांतपणे केलेल्या अभ्यासाची ही सगळी फलश्रुती मिळाल्याची भावना व वडिलांचं स्वप्न पूर्ण केल्याने वडिलांच्या आठवणीने अश्रू अनावर होत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना आकाशने सांगितले.

पान १ वरून

## कोणीतरी ठरवून

देशमुख हत्या प्रकरण आमदार धस यांनीच लावून धरले. या हत्या प्रकरणातील कराड गँगचा सहभागही त्यांनीच राज्यासमोर आणला. धनंजय मुंडे यांच्या भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे त्यांनी वेशीवर टांगली. धनंजय मुंडे यांच्यावर कारवाई करण्यात यावी यासाठी त्यांनी अजित पवार यांचीही भेट घेतली. भाजप आमदारच महायुती सरकारमधील मंत्र्याच्या अब्रूचे जाहीर धिंडवडे काढत असल्यामुळे याचा बोलविता धनी कोण अशी चर्चाही सुरू झाली. भाजपचे ज्येष्ठ नेते तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार धस यांनी आपल्याशी बोलावे असे म्हटले होते. त्यानंतर ही भेट झाल्याचे समोर आल्याने महाराष्ट्र अवाक् झाला आहे.

## बीडमधील अराजकाच्या

पछाडूनही राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या नाकावरची माशीही हललेली नाही. मस्साजोगचे संतोष देशमुख यांच्या हत्येचे गूढ वलय आणि वाल्मीक कराड गँगला असलेला धनंजय मुंडे यांचा राजाश्रय यावरून राज्यभर कोलाहल माजला. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीने महाराष्ट्र ढवळून निघाला. पण अजित पवारांनी धनंजय मुंडे यांना पाठीशी घातले.

आता तर धनंजय मुंडे यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीमध्ये पायघड्याच घालण्यात आल्या आहेत. पक्षाचे धोरण ठरवणे, त्याची अंमलबजावणी करणे यासाठी एक कोअर कमिटी बनवण्यात आली आहे. त्यात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार हे स्वत: आहेत. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ आणि धनंजय मुंडे यांचा या कमिटीमध्ये समावेश आहे. अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांचे मंत्रीपद अबाधित ठेवले असून आता त्यांना पक्षातही मानाचे स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे संतोष देशमुख यांना न्याय मिळणार का, असा प्रश्न सर्वसामान्य बीडकरांना पडला आहे.

## बीडमधील रेल्वेच्या

करण्यात येत असून हे काम हिमाचलम ठेकेदार या कंपनीला देण्यात आले आहे. ठेकेदार रेड्डी तौसीफ अमित सहानी मजुरांकडून काम करून घेतले. पुलासाठी लागणारे लोखंड तोडून घेतले यासह इतर कामे या ठेकेदारांनी मजुरांकडून करून घेतले. मात्र त्यांचे पैसे या कंपनीने दिले नसून या गोर गरीब मजुरांची मजुरी बुडवली आहे. या मजुरांनी त्या ठेकेदाराला पैसाची मागणी केल्यानंतर त्यांनी त्या मजुरांना त्या ठिकाणाहून हकलून दिले. त्यांच्या कडे असलेले भांडेभासनेही हिसकावून घेत स्वतःकडे ठेवून घेतले.पैसे न मिळाल्याने या मजुरावर उपासमारीची वेळ आली असून रेल्वे प्रशासन जिल्हाधिकारी साहेब, खा.बजरंग सोनवणे, आ संदीप क्षीरसागर यांनी या ठेकेदारांकडून या मजुरांचे पैसे मिळवून द्यावे अशी मागणीही जमिर शेख यांनी केली आहे.

## प्रकृतीची चौकशी करायला

त्यांच्याकडून काही सांगण्यात चूक झाली असेल. पंधरा-वीस दिवसांपूर्वी त्यांच्या घरी मी गेलो होतो. तिथे मुंडेही आले होते. प्रदेशाध्यक्षांनी आम्हाला 'मिटतंय का? 'अशा प्रकारचं वाक्य वापरलं होतं. मी क्लिअरकट त्या वेळीच सांगितले. ते 'मनभेद नाहीत, मतभेद आहेत', असे म्हणाले. आमच्यामध्ये मतभेद आहेतच ना.. संतोष देशमुख प्रकरणात मी माघार घेणार नाही. हे मी त्या बैठकीतही क्लिअर सांगितले आहे. ७३ कोटींच्या बोगस घोटाळ्याच्या चौकशीचे पत्र मी अजित पवारांना पाठवले आहे.

## बार्शी नाका-इमामपुर

शहर वासियांसह आजूबाजूच्या तालुक्यांच्या दृष्टीने बार्शी नाका इमामपुर रोडवरील रेल्वे स्टेशन सोयीचे असल्याचा मुद्दा उपस्थित करत या दोघांनी या विषयी खा.बजरंग सोनवणे, राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे, माजी खा.डॉ.प्रितम मुंडे सह रेल्वे प्रशासनाकडे मागणी केली होती. इम्रान जहाँगिरदार व मुसा खॉन यांच्यासह सदस्यांनी रेल्वे स्थानकाचा मुद्दा प्राधान्याने पुढे केला होता. खा.बजरंगबप्पांना सोबत घेऊन बैठक घेतली. एवढेच नव्हे तर खा.बजरंगबप्पांनी समितीच्या पदाधिकाऱ्यांसह बार्शी नाका इमामपुर रोडवरील नियोजीत रेल्वे थांब्याच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी देखील केली होती. अखेर या सर्वांच्या लढ्याला मोठे यश आले आहे.

## आम्हाला रोज धमकावले

देशमुख यांनी केला आहे. आम्हाला रोज धमकावले जात असल्याचेही ते म्हणाले.धनंजय देशमुख यांनी पत्रकारांशी बोलताना कराड गँगचा पर्दाफाश केला. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आठ जण तुरुंगात असले तरी बाहेरून त्यांना मदत करणारा मोठा फौजफाटा सध्या सक्रिय झाला आहे. कराड गँगची ही 'बी टीम'च असल्याचा गौप्यस्फोट त्यांनी केला. बालाजी तांदळे, संजय केदार, शिवलिंग मोराळे आणि डॉ. संभाजी वायबसे यांचे देशमुख यांनी थेट नाव घेतले. हे लोक वाल्मीक कराडला भेटायला पोलीस ठाण्यात जातात. बालाजी तांदळे हा अनेकदा कराडला भेटायला गेला. एकदा बालाजी तांदळे आणि आपली पोलीस ठाण्याच्या परिसरातच भेट झाली. त्यावेळी तांदळे याने सुदर्शन घुलेचा फोटो दाखवून दरडावले होते. त्याची तक्रारही आपण पोलीस अधीक्षकांकडे केली होती. पण पुढे काहीही कारवाई झाली नाही, असे धनंजय देशमुख म्हणाले.

बालाजी तांदळे यानेच गेवराई पोलीस ठाण्याच्या कोठडीत असलेले सुदर्शन घुले, महेश केदार, जयराम चाटे तसेच लातूर कारागृहात असलेला विष्णू चाटे याला गाडी आणि पैसे पुरवले होते. कोठडीत असलेल्या कराड गँगला ब्लॅकेट आणि बिसलरीच्या बाटल्या पुरवणारे हेच लोक आहेत, परंतु पोलिसांनी अजूनही या चौकडीला सहआरोपी - का केले नाही, असा सवाल धनंजय यांनी केला.शिवलिंग मोराळे हा स्वत:ची आलिशान गाडी घेऊन वाल्मीक कराडला सोडण्यासाठी पुण्याच्या पाषाण येथील सीआयडी कार्यालयात गेला होता. तर डॉ. संभाजी वायबसेनै आरोपींना फरार होण्यासाठी मदत केली होती, त्याचबरोबर फरार असल्याच्या काळामध्ये आर्थिक मदत देखील पुरवल्याचे समोर आले होते. डॉ. संभाजी वायबसे याला चौकशीसाठी सीआयडीने ताब्यात देखील घेतले होते. संजय केदार आणि वाल्मीक कराडचे काही शासकीय कामांमध्ये लागेबांधे आहेत. तरी देखील पोलीस यांना सहआरोपी करत नाहीत, असा देखील आरोप देशमुख यांनी केला आहे. या सर्वांचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असल्याचे देखील देशमुख यांनी सांगितले.

पान १ वरून

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रति

मा.अमर हबीब आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने करण्यात येते. १९ मार्च रोजी साहेबराव करपे या शेतकऱ्याने शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या विजेचे बिल भरण्यासाठी पैसे नाहीत म्हणून आपल्या कुटुंबासह सामूहिक आत्महत्या केली. या १९ मार्च रोजी या घटनेला ३६ वर्षे पूर्ण होतील. शेतकऱ्यांसाठीचे जाचक ठरणारे शेतकरी विरोधी कायदे रद्द करा या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या किसान पुत्र आंदोलनाने ८ वर्षांपूर्वी १९ मार्च या दिवशी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी अन्नत्याग आंदोलन ही चळवळ सुरू केली.आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी लिंबागणेश गावातील ग्रामस्थांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.गणेश ढवळे यांनी केले आहे.

## ऐतिहासिक कारंजा

मोठ्या प्रमाणात कचरा पडून असतो. या सर्व कारणांमुळे या ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या इमारतीची गरिमा धुळीस मिळत आहे. याचे अवमूल्यन होत आहे. या सर्व अवस्थेतून कारंजा टॉवरची सुटका करण्यासाठी, परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी कारंजा टॉवरच्या इमारतीमध्ये बीड नगर परिषदेचे तक्रार निवारण केंद्र सुरू करावे. शहरात राहणाऱ्या शहरवासीयांना अनेक समस्या असतात त्या दूर करण्याकरिता बीड शहरवासीयांच्या सोयीसाठी येथे तक्रार निवारण केंद्र सुरू केल्यास बीड नगर परिषदेकडून ऐतिहासिक कारंजा टॉवरची दररोज साफसफाई करण्यात येईल तसेच परिसर ही स्वच्छ ठेवले जाऊ शकेल. शिवाय नूतनीकरणाअगोदर कारंजा टॉवरच्या इमारती लगत आबालवृद्धांसाठी उंच वट्टे बांधलेले होते मात्र बीड नगर परिषदेच्या दुर्लक्षपणामुळे ते वट्टे जमीनदोस्त झाले होते. नूतनीकरणानंतर ते वट्टे पुन्हा बांधण्यात आले नाही. तेव्हा इमारतीच्या पश्चिम, उत्तर आणि दक्षिण बाजूने आबालवृद्धांसाठी वट्टे बांधण्यात यावे किंवा सिमेंटचे बाकडे ठेवण्यात यावे. पर्यायाने कारंजा टॉवरची होत असलेली दुर्दशा थांबवावी. अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

## जोमाने काम करणाऱ्या

यावे. त्या बैठकीला संबधित विधानसभेच्या उमेदवाराला बोलवण्यात यावे, अश्या सूचना यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी केल्या. दरम्यान, संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा होईपर्यंत आपला पक्ष सर्वात पुढे येऊन झटणार आहे. त्यासाठी आपण कायम पाठपुरावा करत आहोत, असा विश्वासही व्यक्त केला. या बैठकीदरम्यान थोर समाजसुधारक आणि बंजारा समाजाचे आराध्यदैवत श्री संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.केज मतदारसंघाच्या वतीने नवनियुक्त जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश सचिव स्व.श्रीहरी काळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

